


दैनिक
अचूक वेध,अचूक बातमी
# अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०५ | अंक : १४७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शुक्रवार, दि.०९ जानेवारी २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## ही बसवलेली माणसं, फक्त मोदींवर अवलंबून : राज ठाकरे

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, मुंबई :** आशियातील सर्वात श्रीमंत मुंबई महानगरपालिकेसाठी ठाकरे बंधु विरुद्ध भाजप-शिंदेसेना असा सामना होणार आहे. त्यापूर्वी ठाकरे बंधुंची संयुक्त मुलाखत समोर आली आहे. दोन्ही बंधुंचा अजेंडा काय, मुंबईच्या विकासासंबंधीचं धोरण काय आणि ते काय मुद्दे मांडतील, काय साद घालतील आणि कुणावर टीका करती याकडे सगळ्याचंच लक्ष लागलं होतं. या मुलाखतीचा पहिला भाग प्रसारित झाला आहे.

त्यात उद्धव ठाकरे आणि राज ठाकरे यांनी जोरदार फटकेबाजी केली. मुंबई तोडण्यापासून ते अदानी आणि भाजप-शिंदे सेनेपर्यंत सर्वच मुद्यांवर दणदणीत, खणखणीत आणि जळजळीत भाष्य दोघांनी केले. यावेळी भाजपवर राज ठाकरे कडाडले.

या मुलाखतीत संजय राऊत यांनी दोन्ही बंधुंवर भाजपकडून विशेषतः मुख्यमंत्र्यांकडून करण्यात आलेल्या



टिप्पणीकडं लक्ष वेधलं. दोन्ही बंधु एकत्र आला यामुळे महाराष्ट्राला आनंद झाला. मराठी माणूस एकवटला. पण भाजपचे सध्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे आपल्या युतीविषयी म्हणतात की ही करप्शन आणि कन्फ्युजनची युती आहे. म्हणजे राज ठाकरे हे कन्फ्युज आहेत, असं ते म्हणतात आणि उद्धवजींवर त्यांनी करप्शनचा आरोप केला. आपण कन्फ्युज आहाता का? असा सवाल संजय राऊत यांनी राज ठाकरे यांना केला. त्यावर राज ठाकरे यांनी खास ठेवणीतील सोटा बाहेर काढून उत्तर दिले.

**“ही बसवलेली माणसं...**

संजय राऊत यांच्या या प्रश्नावर राज ठाकरे यांनी सणसणीत उत्तर दिलं. पहिली गोष्ट म्हणजे या सगळ्यांचा डोलारा हा फक्त नरेंद्र मोदींवर अवलंबून आहे. ही त्यांनीच बसवलेली माणसं आहेत सगळी. यातला बसलेला माणूस कोणीच नाही. बसलेला म्हणजे स्वतः च्या कर्तृत्वावर पुढे आलेला आणि बसवलेला जो माणूस असतो ना, तो फक्त धन्याचं ऐकतो, मालकाचं ऐकतो. मालक जे सांगेल, त्याप्रमाणं काम करायचं. त्यामुळं त्यांच्या बोलण्याला काही लॉजिक आहे असं मला वाटतं नाही, असं उत्तर राज ठाकरे यांनी या आरोपांवर दिलं.

तर विकासाच्या नावाखाली मुंबईत काय काय सुरु आहे, यावरही त्यांनी भाष्य केलं. मुंबई, ठाणे, पनवेल आणि नवी मुंबईत आपण गेलो तर असं दिसतं की प्रचंड मोठ्या प्रमणावर रिडेव्हलपमेंट सुरु आहे. झाडं तोडतायत. होत काय की, आपल्याकडं डीपी बनतो. पण टाऊन प्लॅनिंग होत नाही. मी यापूर्वी पुण्यात म्हणालो होतो की मुंबई खराब व्हायला एक काळ लोटला. पुण्याला तो वेळ मिळणार नाही. पुणं लवकरात लवकर बरबाद होईल, असं राज ठाकरे म्हणाले.

## ढगाळ वातावरणाचा स्ट्रॉबेरीला फटका!

**अक्षराज : विकास दळवी**



**दि.०८, सातारा :** पांचगणी परिसरात गेल्या काही दिवसांपासून सतत ढगाळ वातावरण राहिले आहे. स्ट्रॅाबेरी उत्पादनावर याचा प्रतिकूल परिणाम होत असल्याचे चित्र आहे. हिवाळा संपण्याच्या मार्गावर असतानाच उष्णतेत वाढ अपेक्षित असतानाच मिळालेल्या ढगाळ स्थितीने शेतकरी त्रस्त आहेत. ढगाळ वातावरणामुळे तापमानात अचानक चढ-उतार होत आहेत. यामुळे रोगांचा प्रादुर्भाव वाढत आहे. त्याचा थेट परिणाम स्ट्रॅाबेरी पिकावर होत आहे. अनेक ठिकाणी फळांचा आकार कमी होताना दिसत आहे. तसेच फळांचा अपेक्षित रंग, लालसरपणा व गोडी यावरही नकारात्मक परिणाम झाला आहे. अर्धवट वाढलेली स्ट्रॅाबेरी फळे आणि किडींचा धोका अधिक वाढला आहे.

शेतकरी फळबागा वाचवण्यासाठी फवारणी, कापणी, पाणीपुरवठा यावर अधिक खर्च करत आहेत. रंगाचा अभाव व फळांच्या उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. या रोगांच्या नियंत्रणासाठी शेतकऱ्यांना वारंवार फवारण्या कराव्या लागत आहेत. कीटकनाशके व औषधांच्या वाढत्या किमतीमुळे उत्पादन खर्च वाढत चालला आहे. अपेक्षेप्रमाणे उत्पादन व दर्जा न मिळाल्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवण्याची शक्यता निर्माण झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून स्ट्रॅाबेरी हे महाबळेश्वर तालुक्यातील नगदी पीक म्हणून शेतकऱ्यांमध्ये लोकप्रिय झाले आहे. स्ट्रॅाबेरी हे महागडे व दर्जेदार फळ पीक असल्याने अनेक कुटुंबांचे अर्थकारण पूर्णपणे त्यावर अवलंबून आहे. मात्र सध्याच्या वातावरणामुळे पिकाचे नुकसान, उत्पादनात घट आणि बाजारपेठेतील मागणीत अनिश्चितता यामुळे शेतकरी चिंतेत सापडले आहेत. हवामानातील अचानक बदलामुळे अनेक शेतकरी हतबल दिसून येत आहेत.

## अवैध वाळू उत्खननावर जिल्हाधिकाऱ्यांची धडक कारवाई

### वाहनांसह वाळू जप्त; १८ लाख ३८ हजार रुपयांचा दंड

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.०८, नांदेड :** जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी अवैध वाळू उत्खननाविरोधात कडक भूमिका घेत लोहा तालुक्यातील कौडगाव येथे काल सायंकाळी धडक कारवाई केली. या कारवाईत वाळूसह वाहन व उत्खननासाठी वापरण्यात येणारी साधनसामुग्री जप्त करण्यात आली आहे.

या कार्यवाही दरम्यान वाळूने भरलेला एक हायवा ट्रक, दोन जेसीबी पोकलेन मशीन तसेच अंदाजे ४० ब्रास अवैध वाळू साठा जप्त करण्यात आला. अवैध वाळू वाहतूक करणाऱ्या हायवा ट्रकवर महसूल विभागामार्फत २ लाख ८३ हजार रुपये तसेच परिवहन विभागामार्फत ५५ हजार रुपये दंड आकारण्यात आला आहे.

तसेच प्रत्येकी दोन जेसीबी पोकलेन मशीनवर परिवहन विभागामार्फत प्रत्येकी ७ लाख ५० हजार रुपये दंड आकारण्यात आला असून या संपूर्ण कारवाईत दोन मशीनवर एकूण १५ लाख रुपयांचा दंड आकारण्यात आल्याची माहिती प्रशासनाने दिली आहे.

या कारवाईत लोहा तहसीलदार विठ्ठल परळीकर, नायब तहसीलदार श्री. पाठक, उस्माननगर पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक निलपत्तेवार यांच्यासह महसूल व पोलीस विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.



अवैध वाळू उत्खनन व वाहतुकीविरोधात प्रशासनाकडून यापुढेही कठोर कारवाई सुरू राहणार असून दोषीवर कडक कार्यवाही करण्यात येईल असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहेत.

## फोन करुन खंडणी मागितली, पोलिसांनी डाव उधळला

**अक्षराज : वृत्तसंकलन**



**दि.०८, नागपूर :** दक्षिण भारतातील गाजलेल्या ‘विक्रम’ आणि ‘शिवाजी द बॉस’ या थ्रिलर चित्रपटांमधून प्रेरणा घेत ५० लाख रुपयांची खंडणी उकळण्याचा सिनेस्टाईल कट नागपूर पोलिसांनी वेळेवर कारवाई करत उधळून लावला आहे. बेलतरोडी पोलीस ठाण्याच्या हद्दीत उघडकीस आलेल्या या प्रकरणात भंडारा येथील भूमी अभिलेख कार्यालयातील एका महिला कर्मचाऱ्यासह पाच आरोपींना अटक करण्यात आली आहे. बहिणीच्या लग्नासाठी आर्थिक अडचणीत असलेल्या मुख्य आरोपीने चित्रपटातील पद्धतींचा अवलंब करत हा गुन्हा केल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे.

या प्रकरणातील तक्रारदार प्रकाश ढगे हे भंडारा येथील भूमी अभिलेख कार्यालयात उपअधीक्षक पदावर कार्यरत आहेत. १७ डिसेंबर रोजी भंडाऱ्यातील काम आटोपून नागपूरकडे परत येत असताना वेळाहरी बायपास रोडवर आरोपींनी ढगे यांची कार अडवली. कारच्या मागील काच आणि समोरील दरवाज्याच्या काचा फोडून भीतीचे वातावरण निर्माण करत आरोपी घटनास्थळावरून पसार झाले. या घटनेनंतर १९ डिसेंबर रोजी ढगे यांना अज्ञात क्रमांकावरून धमकीचा फोन आला. तुला मारण्यासाठी २० लाखांची सुपारी देण्यात आली आहे. जीव वाचवायचा असेल तर ५० लाख रुपये दे, अशी थेट धमकी देत आरोपींनी जबलपूर रिंगरोडवरील महादेव ढाब्यावर पैसे आणण्यास सांगितले.

## मोठ्या भावाने धाकट्याची केली निर्घून हत्या !

### विसापूर येथील थरारक घटना : आईवडिलांसह मोठा भाऊ अटकेत...

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.०८, विसापूर (चंद्रपूर) :** दारू पिऊन घरी कुटुंबात नेहमी वाद होत होता. यामुळे घरातील कुटुंबियांना त्रास होत होता. असाच वाद बुधवारी रात्री झाला. वादाचे पर्यवसान कडाक्याच्या भांडणात झाले. राग अनावर झाल्याने मोठ्या भावाने धाकट्याच्या डोक्यावर वासल्याने जबर वार करुन निर्घून हत्या केली. ही थरारक घटना बल्लारपूर तालुक्यातील विसापूर येथे बुधवार (दि. ७) रात्री ९.४५ वाजता घडली.

विशेष म्हणजे या हत्याकांडातील पुरावे नष्ट करण्याच्या अनुषंगाने मृतकाचे शव रेल्वे मार्गावर टाकण्यात आले. मृतक धाकट्या भावाचे नाव गणेश विश्वनाथ भोयर ( वय -२५ ) रा.इंदिरा नगर वार्ड विसापूर ता.बल्लारपूर जि. चंद्रपूर असे आहे. या घटनेतील प्रकरणात आरोपी म्हणून भाऊ गुरूदास विश्वनाथ भोयर (२७),



वडील विश्वनाथ झुंगा भोयर (७१) व आई कौशल्या विश्वनाथ भोयर (५५) यांना बल्लारपूर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. विश्वनाथ भोयर यांची कौशल्या ही दुसरी पत्नी आहे. त्यांना पहिल्या पत्नीचे दोन मुले व दुसऱ्या पत्नीचे दोन मुले आहे. यातील पहिल्या पत्नीचे दोन्ही मुले वेगवेगळे राहत आहे. मात्र विश्वनाथ, कौशल्या, गुरूदास व गणेश एकत्र राहत होते. बुधवारी रात्री गणेश व गुरूदास या भावंडांत दारू पिऊन भांडण झाले. भांडणादरम्यान वाद विकोपाला गेला. रागाच्या भरात गुरूदासने गणेशच्या डोक्यावर लोखंडी वासल्याने जबरदस्त प्रहार केला.

रक्ताच्या थारोळ्यात गणेश जागीच कोसळला. तो मृत झाल्याची खात्री झाल्यावर घरातील तिघेही शांत झाले. विशेष म्हणजे घटनेची माहिती शेजाऱ्यांना देखील झाली नाही. मध्यरात्री १२ ते १ वाजता दरम्यान खुनातील पुरावे नष्ट करायची योजना आरोपींनी आखली. गुरूदास भोयर याने मृतक गणेश च्या पायाला दोरी बांधून गोंदिया - बल्लारपूर रेल्वे मार्गावर ओढत नेले. हा प्रकार रात्री गस्तीवर असलेल्या रेल्वे कर्मचारी दामाजी नरोटे यांच्या लक्षात आला. त्याने रात्री या घटनेची माहिती रेल्वे पोलिसांना दिली. रेल्वे पोलिसांनी बल्लारपूर ठाण्याच्या पोलिसासोबत संपर्क साधून घटनेबाबत अवगत केले. घटनेचे गांभीर्य ओळखून बल्लारपूर पोलिसांनी सकाळी डॉग स्कॉड पाचारण करून हत्याकांडातील माग काढला.

त्यावेळी पोलिसांना जबर धक्का बसला. ज्या ठिकाणी गणेश हा रक्ताच्या थारोळ्यात पडला होता. ती जागा सारवण करून स्वच्छ करण्यात आल्याचा प्रकार उघडकीस आला. संगनमत करून आई, वडील व मोठ्या भावाने धाकट्याच्या काटा काढल्याचे पोलिसांच्या लक्षात आले. याप्रकरणी बल्लारपूर पोलीस ठाण्यात बि.एन.एस.कलम १०३,२३८,३ (५) अन्वये गुन्हा दाखल करून गणेश चा मोठा भाऊ गुरूदास, वडील विश्वनाथ व आई कौशल्या भोयर यांना चौकशीसाठी ताब्यात घेतले आहे.

या घटनेचा पुढील तपास राजुरा उपविभागीय पोलीस अधिकारी सुधीर नंदनवार व बल्लारपूर पोलीस ठाण्याचे निरीक्षक विपीन इंगळे यांच्या मार्गदर्शनात पोलीस उपनिरीक्षक राजेंद्र गायकवाड, वैभव चव्हाण, संतोष एनगंदेलवार,विसापूर चौकीचे अजय झाडे, विजय मैंद व पोलीस कर्मचारी करत आहे.

### पैशाचा वाद घटनेला कारणीभूत असल्याची चर्चा

गणेश भोयर याची आई कौशल्या हिचे वडिलोपार्जित घर गोंडपिपरी येथे होते. त्या घराची विक्री झाली होती. त्यातील ७ लक्ष रूपये कौशल्या भोयर यांच्या हिस्याला आले. त्या पैशातून नवीन घर बांधून घ्यावे, असे कुटुंबात ठरले. मात्र याच पैशाच्या कारणावरून दोघा भावंडांत भांडण उकरून निघत होते. दारूच्या व्यसनात पैशा खर्च होईल. याची भीती कुटुंबात होती. हाच वाद कडाक्याच्या भांडणात झाला. हाच वाद हत्याकांडात कारणीभूत असल्याची चर्चा नातेवाईकांत केली जात आहे.

# तेलसाठ्यासाठीच अमेरिकेची दंडेलशाही !





इंधन तेलाने समृद्ध असलेल्या व्हेनेझुएला या देशावर अमेरिकेने हल्ला करून त्या देशाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो व त्यांच्या पत्नी सिलिया फ्लोरेस यांना जेरबंद करून अमेरिकेच्या तुरुंगात डांबले. अमेरिका व्हेनेझुएलावर हल्ला करणार याची कुणकुण जगाला काही महिन्यापूर्वीच लागली होती. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प हे व्हेनेझुएलावर सातत्याने टीका करत होते. व्हेनेझुएलावर हल्ला केल्यानंतर ट्रम्प यांनी या हल्ल्यामागचे कारण सांगताना सांगितले की अमेरिकेत जी बेकायदेशीर ड्रग्स विक्री होत आहे त्याला व्हेनेझुएला जबाबदार आहे.

व्हेनेझुएला या देशातूनच अमेरिकेत बेकायदेशीर ड्रग्सचा पुरवठा होतो तो रोखण्यासाठी आम्ही हा हल्ला केला मात्र डोनाल्ड ट्रम्प यांचा हा दावा किती तकलादू आहे हे जगाला माहीत आहे. अमेरिकेने व्हेनेझुएलावर का हल्ला केला हे संपूर्ण जग जाणून आहे. या हल्ल्यामागचे खरे कारण हे व्हेनेझुएलातील तेल हे आहे. व्हेनेझुएला हा जगातील चौथ्या क्रमांकाचा तेल उत्पादक देश आहे. अमेरिकेला व्हेनेझुएला मधील हे तेलसाठे हवे आहेत. हे तेलसाठे मिळवण्यासाठीच अमेरिकेने व्हेनेझुएलावर हल्ला केला. अमेरिका स्वतःच्या स्वार्थासाठी आणि फायद्यासाठी कोणत्या थराला जाऊ शकते हे ट्रम्प यांनी या हल्ल्यातून दाखवून दिले आहे.

ट्रम्प यांची ही दंडेलशाही निषेधार्हच आहे संपूर्ण जगाने याचा निषेध करायला हवा. अमेरिकेने केलेले हे कृत्य संयुक्त राष्ट्रसंघाच्या सनदीमध्ये नमूद केलेल्या तत्त्वांचे उल्लंघन आहे. अर्थात अमेरिकेने तेलासाठी किंवा स्वतःच्या फायद्यासाठी एखाद्या देशाची राखरांगोळी केल्याची ही पहिली वेळ नाही. स्वतःला जगाचे फौजदार समजून कोणत्याही देशावर हल्ला करायचा आणि तो देश नेस्तनाबूत करून तेथील तेलसाठे व खनिजे हस्तगत करायचे हे अमेरिकेचे धोरणच आहे. याआधीही त्यांनी असा प्रकार अनेकदा केला आहे. लिबिया या देशावर २०११ साली असाच हवाई हल्ला करून तेथील सत्ताधीश असलेल्या गद्दाफी यांची ४२ वर्षाची सत्ता संपुष्टात आणली होती. लिबिया हा आफ्रिकेतील सर्वात मोठा तेलसाठा असलेला देश होता. अमेरिकेला तो तेलसाठा हवा होता जोवर गद्दाफी सत्तेवर असतील तोवर त्यांना हा तेलसाठा मिळणार नव्हता म्हणून अमेरिकेने त्यांना हटवले त्यासाठी त्यांनी थेट त्या देशावर हवाई हल्ला केला. इराक हा असाच तेल साठ्याने समृद्ध असलेला देश. या इराकमध्ये सद्दाम हुसेन यांची हुकूमशाही होती. सद्दाम हुसेन आपल्याला तेल देणार नाही हे अमेरिका जाणून होती म्हणून मग इराकने घातक शस्त्रसाठा जमवला असून या शस्त्रांनी सपूर्ण जगाला धोका निर्माण झाला आहे अशी आवई अमेरिकेने उठवली आणि इराकने जमवलेली शस्त्रास्त्रे हस्तगत करायची आहेत असे सांगून इराकवर हल्ला केला आणि सद्दाम हुसेन यांना फासावर लटकवले मात्र ज्या घातक शस्त्रांचे कारण सांगून अमेरिकेने इराकवर हल्ला केला ती घातक शस्त्रे अमेरिकेला मिळालीच नाही.

मिळणार तरी कशी? कारण तशी घातक शस्त्रे इराकमध्ये नव्हतीच. अमेरिकेला मिळाले ते इराकमधील तेलसाठे. अमेरिकेने इराकमधील तेलसाठ्यासाठी सपूर्ण इराक बेचिराख करून टाकले होते. १९८९ साली पनामा या छोट्या देशावर देखील अमेरिकेने अमली पदार्थांचा व्यापार चालू असल्याचा आरोप करून हल्ला केला होता. या हल्ल्यात ही त्या देशाचे तत्कालीन राष्ट्रप्रमुख मॅन्युअल नोरियोगा यांना अटक करून ४० वर्षाची शिक्षा सुनावली होती. या हल्ल्याम ागचे मुख्य कारण हे होते की पनामा कालवा हा जागतिक व्यापारासाठी महत्वाचा होता. या कालव्यावर अमेरिकेला स्वतःचे नियंत्रण मि ळवायचे होते. नोरियोगांना सत्तेवरून हटवल्या शिवाय अमेरिकेला पनामा कालव्यावर नियंत्रण मिळवणे अशक्य होते त्यासाठीच त्यांनी अवैध अमली पदार्थांची तस्करी केल्याचा आरोप ठेवून या देशावर हल्ला केला आणि पनामा कालव्यावर स्वतःचे नियंत्रण मिळवले. व्हिएतनाम या देशावर देखील तेलसाठ्यासाठीच अमेरिकेने अनेकदा हल्ले केले. आताही अमेरिकेने त्याच कारणासाठी व्हेनेझुएलावर हल्ला केला. आता ते व्हेनेझुएलात स्वतःच्या मर्जीतील व्यक्तीला सत्तेवर बसवतील आणि त्याच्या माध्यमातून व्हेनेझुएलातील तेलसाठ्यावर नियंत्रण मिळवतील. अमेरिकेच्या व्हेनेझुएला वरील हल्ल्याने जगात भयंकर संदेश गेला आहे. आपल्याला मान्य नसलेल्या दुसऱ्या देशाच्या नेत्यांविरोधात अशी कारवाई करता येऊ शकते हे अमेरिकेने जगाला पुन्हा एकदा दाखवून दिले आहे. भविष्यातही याची पुनरावृत्ती होऊ शकते म्हणूनच अमेरिकेच्या या दंडेलशाही विरुद्ध जगाने एकत्र यायला हवे. अमेरिकेच्या या दंडेलशाहीविरुद्ध आता संपूर्ण जगाने आवाज उठवायला हवा.



**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

## इराणमध्ये 'बझार' चे आव्हान



पर्शियन भाषेतून 'बझार' हा शब्द हिंदीत आला. त्याचा नंतर मराठीत 'बाजार' झाला आणि येथील जनजीवनाचा, भाषेचा अभिन्न घटक बनला. येथील 'हाट' बरोबर हातमिळवणी करून त्याने 'बाजारहाट' रूप धारण केले. 'बझार'मध्ये सर्वकाही आहे. धर्म, अर्थ, उद्योग, कला, यांचा प्रामुख्याने आर्थिक आणि जास्त प्रमाणात इस्लामी परंपरेकडे झुकणारा संगम आहे 'बझार'. आपल्या मायभूमीत, इराणमधील मूलतत्त्ववादी सत्ताधाऱ्यांसमोर एक मोठेच आव्हान अलीकडे 'बझार'ने निर्माण केले आहे.

इराणमध्ये मोठ्या प्रमाणात आर्थिक संकट निर्माण झाले आहे. चलनवाढ आणि महागाईमुळे दैनंदिन जीवन अवघड झाले आहे. त्यामुळे डिसेंबरअखेरीस पासून व्यापारी वर्ग (बझार) रस्त्यावर उतरून सरकारच्या आर्थिक धोरणांच्या विरोधात निदर्शने करतो आहे आणि त्यांना सर्वसामान्य नागरिकांची साथ मिळाल्याचे दिसते आहे. ही निदर्शने आता देशव्यापी बनली आहेत. अनेक शहरांमधील नागरिक आणि अनेक विद्यापीठांमधील युवावर्गही यांत आघाडीवर आहे. या निदर्शनांची सुरुवात आर्थिक कारणांमुळे झाली असली तरी इस्लामी मूलतत्त्ववादी सरकार हटविण्याच्या मागणीपर्यंत ती जाऊन पोहोचली आहे. इराणचे सर्वेसर्वा अली खामेनी यांच्याविरुद्ध 'डेथ टू डिक्टेटर' अशीही घोषणा दिली गेली आहे. नागरिकांचे आंदोलन मोडून काढण्याचा इतिहास असणाऱ्या सरकारने हे आंदोलनही दाबण्याचा प्रयत्न केला आहे. यापूर्वी २०२२ मधील देशव्यापी निदर्शने सरकारने दडपली होतीच. आजघडीला चालू असणाऱ्या निदर्शनांमध्ये एक युवक प्राणाची पर्वा न करता तेहरानच्या चौकात भर रस्त्यावर, सुरक्षा सैनिकांच्या वाहनांसमोर अडून बसला होता. या घटनेची तुलना १९८९ मधील चीनमधील तियानमेन चौकातील निदर्शनांशी केली जातेय. इंटरनेट सेवा कधी खंडित होते तर कधी मंद गतीने चालू आहे. दरम्यान, इराणचे अध्यक्ष मसूद पेझेश्कियान यांनी निदर्शकांच्या मागण्या बरोबर असून त्यावर सरकारने लवकर कृती करणे गरजेचे आहे, असे स्पष्ट केले आहे.

या सर्व घडामोडींमध्ये 'बझार'ची भूमिका महत्त्वाची ठरते आहे. इराणमध्ये 'बझार' हे अर्थ-उद्योगाचे व्यापाराशी संबंधित केंद्र आहे तसेच इराणच्या धार्मिक सत्तेशी जवळीक राखणारे आणि राजकारणाशी संबंधित असलेले (अघोषित) व्यासपीठ आहे. व्यापारी वर्ग येथील कणा. पण यात विविध क्षेत्रातील मंडळींचा सहभाग अनेकदा अप्रत्यक्षरीत्या असतो. यात सहभागी असणाऱ्यांना 'बझारी' म्हणतात. समन्वयवादी भूमिका घेऊन सरकार दरबारी विविध मुद्दे मांडण्याचे काम 'बझार' करतो. अगदी इराणच्या परकीय धोरणावरही 'बझार'चा प्रभाव असू शकतो, असे जाणकार म्हणतात.

'बझार'चे मूळ पर्शियन साम्राज्यात सापडते. तेव्हाही एकूण आर्थिक घडामोडींत, राजघराणी आणि सामान्य नागरिक यांच्यातील एक दुवा म्हणून 'बझार' कार्यरत होते, असे म्हटले जाते. काळाप्रमाणे 'बझार'चे रूप बदलत गेले तरी मूळ भूमिका मात्र कायम राहिली. त्यानंतर तिथे इस्लामचा प्रसार झाल्यानंतरही 'बझार' अर्थ-उद्योग व राजकीयदृष्ट्या कार्यरत राहिला. १९०५ ते १९११ या अल्पकाळात तिथे घटनात्मक क्रांती झाली होती तेव्हाही 'बझार' ने आपली भूमिका बजावली होती. यानंतर इराणमधील अनेकानेक घडामोडींत बझारचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष सहभाग राहिला. महंमद रेझा शाह पहलवी (१९४१ ते १९७९) यांच्या सुधारणांच्या काळात 'बझार'चा आर्थिक फायदा झाला. पण तेव्हा इराणचे होत असलेले आधुनिकीकरण 'बझारीं'च्या पचनी पडले नाही. इराण जास्त प्रमाणात पश्चिमेकडे झुकतो आहे, असे लक्षात आल्याने आणि एकूणच राजेशाहीला विरोध यामुळे १९७९ मध्ये 'इस्लामिक क्रांती' झाली तेव्हा 'बझार'ने इस्लामच्या बाजूने कल दर्शवला होता. यानंतर अनेक वर्षे 'बझार'ने आपले समन्वयवादी धोरण कायम ठेवून धर्मसत्तेशी इमान राखले. गेल्या काही वर्षांत मात्र 'बझार'च्या भूमिकेत थोडा बदल होत गेलेला दिसतो. इराण जितका मूलतत्त्ववादाकडे झुकत गेला तसतसे 'बझारी' अस्वस्थ होऊ लागले. पण धर्मसत्तेला विरोध करण्याचे धाडस त्यांच्यात नव्हते. सुधारणावादी नागरिक एकत्र येऊन कुठे कुठे धर्मसत्तेच्या विरोधात आवाज उठवत होते, तरी 'बझार' मात्र परंपरेच्या बाजूनेच उभा होता. त्यांच्या भूमिकेत थोडा बदल झालेला दिसला तो २०२२ मध्ये. सुधारणावादी नागरिकांनी हिजाबच्या आणि स्त्री स्वातंत्र्याच्या मुद्द्यावरून धर्मसत्तेच्या विरोधात मोठ्या प्रमाणात निदर्शने केली तेव्हा निदर्शकांना माणुसकीच्या नात्याने मदत करण्यात 'बझार'ने पुढाकार घेतला होता. पण तरी त्यांनी सत्ताधारी धर्मसत्तेशी इमान कायम राखले होते. त्यामुळे सुधारणावादी नागरिक व बझारी यांच्यात एक दुरावा कायम होता. सध्या चालू असलेल्या निदर्शनांमध्ये मात्र 'बझारीं'नी आपला पवित्रा बदलला आहे. इतक्या वर्षांपासूनची आपली धर्माकडे झुकणारी आणि समन्वयवादी भूमिका त्यांनी दूर ठेवली आहे. इस्लामिक धर्मसत्तेला ते आता थेट विरोध करीत आहेत. सामान्य नागरिकांचे हाल होत असताना इराणने आपला अण्वस्त्रांचा कार्यक्रम राबवू नये असे मत 'बझारी' आता मांडत आहेत आणि निदर्शने करीत आहेत.

# मतदान हा आपला अधिकार आणि कर्तव्यसुद्धा !



लोकशाही पद्धतीमध्ये निवडणूक प्रक्रियेला अनन्यसाधारण महत्व आहे. त्यामुळे ही प्रक्रिया एखाद्या उत्सवाप्रमाणे पार पडते. राजकीय पक्षाचे नेते, पदाधिकारी आणि कार्यकर्ते या उत्सवात हिरीरीने सहभागी होत असले, तरी या उत्सवाचा उत्सवमूर्ती असतो तो 'मतदारराजा'. त्याच्या उपस्थितीशिवाय या उत्सवाला अर्थ नसतो. त्याला या सर्व प्रक्रियेत केवळ एकदा सहभागी व्हायचे असते. स्वतःच्या, आपल्या कुटुंबाच्या आणि समाजाच्या, भवितव्याचा निर्णय त्याला या एका दिवसात घ्यायचा असतो त्यामुळे तो योग्यही असायला हवा हे पाहण्याचे दायित्वही त्याचेच असते.

मतदानाचे महत्व किती आहे हे जुन्या जाणत्या मतदारांना ठाऊक नाही असे नाही तरीही निवडणूका जवळ आल्या की प्रशासन मतदारांमध्ये जागृती कारण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करत असते. विविध प्रसिद्धी माध्यमांसह सामाजिक माध्यमांवर मतदान करण्याबाबत जागृती करण्यासाठी जाहिराती दिल्या जातात. गर्दीची ठिकाणे, प्रवासी वाहने यांतूनही म तदारांचे प्रबोधन केले जाते. केवळ मतदारांना जागृत करण्यासाठी कोट्यवधी रुपये खर्च केले जातात. एव्हढे सर्व करूनही मतदानाचा टक्का जेमतेम पन्नाशी पार करतो. ज्या व्यवस्थेत देशातील केवळ पन्नास टक्के जनताच ती घडवण्यात सहभाग घेते ती व्यवस्था सक्षम आहे असे कसे म्हणता येईल. चार चौघांत या लोकशाही व्यवस्थेचे वाभाडे काढणारी, राज्यकर्त्यांना शिव्या देणारी, राज्याच्या आणि देशाच्या बिघडलेल्या स्थितीवर तोंडसुख घेणारी जनता जेव्हा या सर्वांमध्ये बदल घडवण्याची संधी आपल्या हाती मिळते तेव्हाच पळ का काढते ?

माझा समाज, महा जिल्हा सक्षम व्हायला हवा, येथील जनता सुखाने नांदायला हवे, येथील नागरिकांना सर्व सोयी-सुविधा आणि संरक्षण मिळायला हवे त्यामुळे यापुढे असे करून चालणार नाही. लोकशाही सक्षम करायची असेल तर सर्वप्रथम मतदान करण्यासाठी घराबाहेर पडायला हवे. त्याहीपुढे जाऊन आपल्या घरातील आणि आपल्या परिसरातील कोणी मतदाता मतदानापासून वंचित राहू पाहत असेल तर त्याचेही प्रबोधन करून त्याला मतदान करण्यास प्रवृत्त करणे हे आपले राष्ट्रीय कर्तव्यच आहे.

लोकप्रतिनिधींच्या कामाबद्दल आपला रोष आपण वर्षभर प्रकट करतच असतो मात्र त्यांना अद्दल घडवण्याची आणि योग्य लोकप्रतिनिधी निवडण्याची संधी आपल्याला पाच वर्षांतून एकदा मिळते ती दवडता कामा नये. यंदा तर ही संधी तब्बल आठ वर्षानंतर मिळते आहे. गेल्या काही वर्षांत शहरांतील अनेक मंडळी आपली शहरातील घरे विकून अथवा भाड्याने देऊन अंबरनाथ, बदलापूर, वांगणी यांसारख्या ठिकाणी स्थलांतरित झाली आहेत; मात्र त्यांचे नाव अद्यापही शहरातील त्यांच्या घरांच्या पत्यावरील मतदार याद्यांमध्ये आहे अशा मंडळींना मतदानासाठी वेळ काढून बोलावण्याचे कामही शेजारी राहणाऱ्या मंडळींनी करावे. शहराबाहेर गेलेली ही सर्वच मंडळी मतदानासाठी एव्हढ्या लांबून येतील असेही नाही; मात्र यातील काहीजण तरी आपण केलेल्या आग्रहामुळे लाजेखातर का होईना शहरात मतदान करण्यासाठी नक्कीच येतील.

याचसोबत आपल्या शेजारी राहणाऱ्या मंडळींपैकी कोणी मतदानाच्या दिवशी सहलीचे नियोजन करत असेल, तर अशांचेही प्रबोधन करून त्यांचे नियोजन हाणून पाडण्याचे दायित्व आपण घेऊया. प्रमुख शहरांतील निवडणूका अत्यंत प्रतिष्ठेच्या मानल्या जातात बऱ्याचदा येथील निकालांवर राज्यातील जनमताचा कौल लक्षात घेतला जातो त्यामुळे या ठिकाणची टक्केवारी वाढवणे राजकीय पक्षांसाठी जिकरीचे असते. शिवाय शहरातील मतदान केंद्रे ही बऱ्याचदा घरापासून एक ते दीड किलोमीटरच्या अंतरातच असतात त्यामुळे ग्रामीण भागाच्या तुलनेत शहरी भागात मतदान अधिक होणे अपेक्षित असते; मात्र दुर्दैवाने तसे घडत नाही. 'माझ्या एका मताने काय फरक पडणार आहे' ही मानसिकता लोकशाहीसाठी अत्यंत घातक आहे. २००४ च्या कर्नाटक विधानसभा निवडणुकीत उमेदवार ए. आर. कृष्णमूर्ती यांना ४०७५१ मते पडली, तर त्यांच्या प्रतिस्पर्धी उमेदवाराला ४०७५२ मते पडली, परिणामी ए. आर. कृष्णमूर्ती यांचा केवळ एका मताने पराभव झाला.

२००९ च्या राजस्थान राज्याच्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री पदाचे दावेदार असलेले सी.पी. जोशी यांना ६२२१५ मते पडली, तर त्यांच्या विरोधात उभे राहिलेल्या कल्याण सिंह चौहान यांना ६२२१६ मते पडली. अटीतटीच्या या लढतीमुळे सी.पी. जोशी यांना आमदारकीसह मुख्यमंत्री पदावरही पाणी सोडावे लागले. १९९९ साली अटल बिहारी वाजपेयी पंतप्रधान असताना विरोधी पक्षांनी विद्यमान सरकारविरोधात अविश्वास ठराव आणला. वाजपेयी या ठरावाला हिमतीने सामोरे गेले. या ठरावावर झालेल्या मतदानात अटल बिहारी वाजपेयी यांच्या बाजूने २६९ मते पडली, तर विरोधात २७० मते पडली. केवळ एका मताच्या फरकामुळे वाजपेयी सरकार १३ दिवसांतच कोसळले. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांत मतदारांची संख्याही अल्प असल्याने याठिकाणीही अशाप्रकारची चुरस असते.

अनेकद उमेदवार हाताच्या बोटावर म ोजता येईल इतक्या फरकाने निवडून येतात. एका मताचे महत्व सांगणारी अशी अनेक उदाहरणे जगाच्या राजकारणात होऊन गेली आहेत त्यामुळे एक मताने काय फरक पडणार आहे असे म्हणणेच मुळात चुकीचे आहे. लोकांच्या मनात लोकशाही किती रुजली आहे हे निवडणुकांतील मतदानाच्या टक्केवारीवरून दिसून येते. विश्वातील सर्वात मोठे लोकशाही राष्ट्र म्हणून बिरुद मिरवणाऱ्या भारतातील मतदारांची मतदानाविषयीची नाराजी निंदनीय आहे, ही टक्केवारी वाढवण्यासाठी आज सर्वांनी मिळून प्रयत्न करणे आवश्यक आहे.

**जगन घाणेकर, घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

## अंमली..

गाडी मध्ये चिडीचूप
लपव पदार्थ अंमली
गुन्हेगारांसहीतफोटो
जोडी जमली रमली

आपणा नडेल त्याचे
नावाले अदृश्य फुली
आपल्या निर्णयांशी
ॲग्री असावा फुल्ली

विरोधात बोलू पाही
विरळाचं एक कल्ली
जबाबदारी द्या अशी
ओझ्यांने दबेल कुली

आपण दिसावे सभ्य
पदरी ठेवावे मवाली
दाद देणारे आपणचं
गाई आपली कवाली

मिंथ्या यंत्रणेच्या करे
मग नाठाळा हवाली
दिवाळे निघो कुणाचे
व्हावी माझी दिवाळी

जेरबंद करा बिबट्या
भाडोत्रीहव्या मशाली
तारणहार बनून वेळी
विचारा जना खुशाली

उघड्या लफड्या वरी
पांघर रेशमाच्याशाली
सोडणार ना गुन्हेगारा
उघडपणे द्यावी गाली

**– हेमंत मुसरीफ पुणे.**
**९७३०३०६९९६.**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## शंकरराव चव्हाण विद्यालयात 'सखी सावित्री समिती' सभा संपन्न



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.०८, नागपूर :** खापरखेडा औष्णिक वीज केंद्राच्या प्रकाशनगर वसाहतीत असलेल्या शंकरराव चव्हाण विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयात ७ जानेवारी २०२६ रोजी 'सखी सावित्री समिती' ची विशेष सभा पार पडली. सभेत विद्यार्थ्यांचे आरोग्य, सुरक्षा आणि शिक्षणाचे महत्त्व यावर तज्ज्ञांनी मोलाचे मार्गदर्शन केले. सभेच्या सुरुवातीला सरस्वती माता आणि ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून द्वीप प्रज्वलन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाच्या मुख्याध्यापिका वीणा पांडे होत्या तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ.क्षितिजा महाजन, पोलीस उपनिरीक्षक प्रियंका पाटील यांची विशेष उपस्थिती होती.

यावेळी डॉ.क्षितिजा महाजन यांनी मुलांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने 'गुड टच आणि बॅड टच' यातील फरक कसा ओळखावा आणि अशा प्रसंगी स्वतःचा बचाव कसा करावा याचे सविस्तर मार्गदर्शन केले. शिवाय पोलीस उपनिरीक्षक प्रियंका पाटील यांनी सावित्रीबाई फुले यांच्या संघर्षाची आठवण करून देत शिक्षणाचे महत्त्व विशद केले, तसेच सध्याच्या काळात मोबाईलचा वाढता वापर आणि त्यातून होणारे दुष्परिणाम यावर त्यांनी प्रकाश टाकला. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणजे इयत्ता ९ वर्गाची विद्यार्थिनी कु.आलिया बानू शेख हिने उपस्थित सर्व विद्यार्थ्यांना स्वसंरक्षणाची शपथ दिली तिच्या पुढाकाराचे सर्वांनी कौतुक केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षा मुख्याध्यापिका वीणा पांडे यांनी सखी सावित्री समितीच्या स्थापनेचा उद्देश स्पष्ट केला त्या म्हणाल्या की केवळ पुस्तकी ज्ञान देने हे विद्यालयाचे ध्येय नाही. विद्यार्थ्यांचे मानसिक व शारीरिक आरोग्य सुरक्षित ठेवने ही विद्यालयाची प्राथमिकता आहे. आजच्या काळात मुलांनी आपल्या हक्काप्रति आणि सुरक्षिततेप्रति जागरूक राहणे काळाची गरज आहे. पालकांनी ही मुलांशी सवांद वाढवून त्यांच्यातील वेळीच बदल टिपणे आवश्यक आहे असे आवाहन केले. सभेला समितीचे समुपदेशक समीर नागदेवे, पालक प्रतिनिधी फातमा खातून, तसेच विद्यार्थी प्रतिनिधी मेघा सूर्यवंशी, भूमिका वर्मा, शिल्पा सहानी आणि आयूष गुप्ता यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे संचालन सुरेखा चिखले यांनी केले तर चंद्रकांत मोहोड यांनी उपस्थितांचे आभार मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी पुष्पा बढिये, नरेंद्र बुटोलिया, प्रमोद इंगळे, निरज मिश्रा, गीता जालंदर आणि जिजा जैन यांनी विशेष परिश्रम घेतले.

## जनता विद्यालयात क्रीडाशिक्षक श्री.केसरे व श्रीमती चव्हाण यांचा सत्कार



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, लातूर :** जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पोहरेगाव शाळेचे क्रीडा शिक्षक हनमंत दिगंबर केसरे यांनी राज्यस्तरीय सूर्यनमस्कार शिक्षण प्रशिक्षण (ढजढ) स्पर्धा आणि दोन दिवसीय योगसाधना शिबिरामध्ये सहभाग नोंदविल्यामुळे मेडल व प्रमाणपत्र मिळाले. रेनापुर तालुका योग समिती मार्फत त्यांची निवड अंबड या ठिकाणी झाली होती. महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण संस्था पुणे यांच्या वतीने शिक्षक, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. त्यातील राज्यस्तरीय शिक्षक बोर्ड स्पर्धा परीक्षेसाठी जनता माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय पोहरेगाव येथील इंग्रजी विषयाच्या शिक्षिका वैशाली चंद्रभान चव्हाण (यादव) यांची निवड करण्यात आली. शिक्षकांच्या सुप्त कलागुणांना व कौशल्यांना वाव देण्यासाठी शिक्षक स्पर्धा व विविध शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या उपक्रमांचा मुख्य उद्देश शिक्षकांचा कौशल्य विकास, तंत्रज्ञानाचा प्रसार नाविन्यपूर्ण शिक्षण पद्धतीचा अवलंब आणि व्यावसायिक प्रगती साधने हा होता. या अंतर्गत वक्तृत्व पोस्टर निर्मिती, शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती, बोर्ड परीक्षा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. शिक्षक बोर्ड स्पर्धा परीक्षेमध्ये चव्हाण यांनी विभागीय स्तरावर घवघवीत यश संपादन केले. तसेच त्यांची राज्यस्तरीय बोर्ड परीक्षेसाठी निवड करण्यात आली आहे. त्याबद्दल या दोघांचे संस्थेचे अध्यक्ष शिरीष यादव, संस्थेचे सचिव सदानंद शिंदे, शाळेचे मुख्याध्यापक धनंजय तट, सर्व शिक्षक व शिकेत्तर कर्मचारी यांनी त्यांचे अभिनंदन केले व पुढील कार्यासाठी त्यांना शुभेच्छा दिल्या.

## अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसानिमित्त मोफत आरोग्य शिबीर



**अक्षराज : पूनम परदेशी**

**दि.०७, सोयगाव (छ.संभाजीनगर) :** आमदार अब्दुल सत्तार यांच्या वाढदिवसानिमित्त नॅशनल मेडिकल कॉलेज, सिल्लोड तर्फे मोफत आरोग्य शिबीर ग्रामीण रुग्णालय, सोयगांव येथे आयोजित करण्यात आले. या शिबिरासाठी आजूबाजूच्या गावातील बहुसंख्य नागरिकांनी हजेरी लावून आपल्या आजाराचे निदान केले. आरोग्य शिबिराचे उदघाटन उपजिल्हाप्रमुख प्रभाकरराव (आबा) काळे यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी नगराध्यक्षा आशाबी तडवी, रुग्ण कल्याण समितीचे सदस्य रमेश गव्हाडे, शहर प्रमुख संतोष बोडखे, गटनेता अक्षय काळे, गोपीचंद जाधव,नगरसेवक हर्षल काळे, कदीर शहा, गजानन कुडके, लतीफ शहा, संध्याताई मापारी, ध्रुपताबाई सोनवणे, सुरेखा तायडे, योगेश पाटील,अमोल मापारी, समाधान काळे, शेख बबलू, संदीप चौधरी, प्रताप जाधव, किशोर मापारी, विनोद राठोड, सुनील निकम, भरत तायडे, नॅशनल मेडिकल कॉलेजचे डॉ.अहेमद शरीफ देशमुख, डॉ.अक्षय झवर, डॉ.अमन शहा, डॉ.रेणुका पायघन, डॉ.सना शेख, डॉ.दिव्या खोमणे, नंद वराडे, कविता टोम्पे, शितल शिंदे, अर्चना सपकाळ, दिव्या गायकवाड, अश्विनी दुधे, दीपाली राऊत, मनिषा बकले, जयश्री बकले, प्रतीक्षा गोफणे, कीर्ती गवई, भारती सुरे, जया अंदुरे, मुस्कान बेगम, कविता बकले, मिलिंद अहिरे, अभिजित बोर्डे, अभिषेक गाडेकर, शेख हुजेफ, मरिअम सैय्यद, अरबाज पठाण, अफरोज शेख हे उपस्थित होते.

# मुरबाडमध्ये बिबट्याच्या दहशतीने भीतीचे वातावरण...

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.०८, मुरबाड (ठाणे) :** मुरबाड तालुक्यातील मानिवली–शिंदीपाडा परिसरात हिंस्र वन्यप्राण्याने केलेल्या हल्ल्यात शेतकरी काळुराम भगवान गोल्हे यांच्या चार बकऱ्या ठार झाल्याची घटना उघडकीस आली आहे. या घटनेमुळे संबंधित शेतकऱ्याचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून परिसरात बिबट्या असल्याच्या शंकेने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.




### मानिवली–शिंदीपाडा येथे ४ बकऱ्यांवर हल्ला !

काळुराम गोल्हे यांनी शेतीच्या कामासाठी शेतावरच घर बांधले असून शेतीला जोडधंदा म्हणून बकरी पालन सुरू केले होते. मात्र अचानक झालेल्या या हल्ल्यामुळे त्यांचा महत्त्वाचा उदरनिर्वाहाचा स्रोत हिरावून गेला आहे. बकऱ्यांवर झालेल्या हल्ल्याच्या खुणा पाहता हा हल्ला बिबट्यासारख्या हिंस्र वन्यप्राण्याने केल्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. या घटनेमुळे मानिवली–शिंदीपाडा परिसरासह संपूर्ण मुरबाड तालुक्यात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष म्हणजे काही दिवसांपूर्वीच मुरबाड तालुक्यातील टोकावडे परिसरात बिबट्या दिसल्याच्या चर्चेमुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली होती. आता पुन्हा शहापूर तालुक्याच्या सीमेलगत असलेल्या मुरबाड तालुक्यात ही घटना घडल्याने मुरबाड व शहापूर दोन्ही तालुक्यांतील नागरिक सतर्क झाले आहेत. दरम्यान, या घटनेची माहिती मिळताच वनविभागाने तातडीने दखल घेतली. परिमंडळ सरळगाव अंतर्गत मौजे मानिवली बु. येथील काळुराम भगवान गोल्हे यांच्या शेतातील बेड्यावर ठेवलेल्या चार बकऱ्या हिंस्र वन्यप्राण्याच्या हल्ल्यात ठार झाल्याचे निष्पन्न झाले. याबाबत परिमंडळ सरळगाव येथील वनपरिक्षेत्र अधिकारी अल्पना घोलप व गजानन मुसळे यांनी आपल्या स्टाफसह प्रत्यक्ष घटनास्थळी भेट देऊन पंचनामा व जबाब नोंदवले. ठार झालेल्या बकऱ्यांचे शवविच्छेदन मुरबाड येथील पशुवैद्यकीय अधिकाऱ्यांकडून करून घेण्यात आले आहे. तसेच गावकऱ्यांना रात्रीच्या वेळी विशेष काळजी घेणे, पाळीव जनावरे सुरक्षित ठिकाणी बांधणे व संशयास्पद हालचाल दिसल्यास तात्काळ वनविभागाला कळवण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

यावेळी गावचे सरपंच व्ही. पी. वारघडे,उपसरपंच चेतन मधुकर गोल्हे, तसेच ग्रामपंचायत सदस्य रंजना रघुनाथ वारघडे आदी उपस्थित होते. सतत होत असलेल्या अशा घटनांमुळे शेतकरी व ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण असून वनविभागाने तातडीने उपाययोजना करून बिबट्याचा बंदोबस्त करावा, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# महाबळेश्वरच्या स्वच्छतेला प्रथम प्राधान्य देणार : नगराध्यक्ष सुनिल शिंदे

**अक्षराज : रियाज मुजावर**

**दि.०८, महाबळेश्वर :** महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण असून पर्यटनासाठी देश विदेशात प्रसिद्ध आहे महाबळेश्वर येथे मोठ्या प्रमाणात पर्यटक येत असतात मागिल काही दिवसापासून येथील स्वच्छतेचे तीनतेरा वाजले असून यातून महाबळेश्वरचे नावलौकिक खराब होत आहे. ही बाब लक्षात घेऊन महाबळेश्वर नगरपरिषदेचे नवनिर्वाचित नगराध्यक्ष सुनिल शिंदे अपल्या सहकारी नगरसेवकांसह रस्त्यावर उतरले आहेत नगरपालिका अधिकारी तसेच स्वच्छता कर्मचाऱ्यांना सूचना देऊन महाबळेश्वर शहर परिसर स्वच्छ करण्याची मोहिम सुरु केली आहे. याची सुरुवात त्यांनी महाबळेश्वर येथील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून करण्यात आली

या मोहिमेमध्ये नगराध्यक्ष सुनील शिंदे यांच्या समवेत नगरसेवक अफजल सुतार, ॲड संजय जंगम, संतोष शिंदे ,राहुल पिसाळ, रोहित ढेबे , नगरसेविका विमलताई पारठे, संगीता वाडकर, रेश्मा ढेबे, पल्लवी कोंढाळकर ,प्रियांका वायदंडे यांच्यासह नगरपरिषदेचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते .छत्रपती शिवाजी महाराज चौक महाबळेश्वर येथील एकमेव प्रशस्त असा चौक आहे.

या चौकातच बंद पडलेली वाहने पार्कींग करुन ठेवण्यात आली आहेत. यामुळे पर्यटकांना वाहन पार्कींगसह अन्य सुविधांपासून वंचित रहावे लागत आहे. तापोळ्याला जाणाऱ्या मार्गावरील हा महत्त्वाचा चौक आहे नगराध्यक्ष श्री. शिंदे यांच्या कारवाईमुळे चौकातील वाहतूक कोंडी सुटण्यास मोठी मदत होणार आहे. या चौका लगत असणाऱ्या ग्रामीण रुग्णालयाच्या भिंतीच्या बाजूला प्रचंड घाणीचे साम्राज्य पसरले असून या मुळे एके काळी शहराची शोभा वाढवणारा हा चौक बकाल झाला आहे . हा महत्वाचा चौक असल्याने या भागात वाहनांची चांगलीच वर्दळ



असते अस्ताव्यस्त पार्किंगमुळे नेहमीच या चौकात प्रचंड वाहतुक कोंडीचा सामना करावा लागतो. छत्रपती शिवाजी महाराज चौकात नेहमीच पर्यटकांची वर्दळ असते. त्यामुळे बंद पडलेली वाहने तात्काळ हटवावीत.

तसेच हा चौकाची रोजच्या रोज स्वच्छता करण्यात यावी अशा सूचनाही नगराध्यक्ष श्री सुनिल शिंदे यांनी दिल्या नगरपरिषद स्वच्छता कर्मचाऱ्या कडून कामात दिरंगाई झाल्यास संबंधित कर्मचाऱ्यांवर कारवाई केली जाईल असा इशाराही त्यांनी दिला. महाबळेश्वर शहराच्या स्वच्छतेला प्राधान्य देण्यात येईल तसेच स्वच्छ सुंदर हरित महाबळेश्वर चा नावलौकिक कायम राहील यासाठी प्रयत्नशील राहणार असल्याचे सांगितले.

# राज्यस्तरीय ७ व्या जाधवर विज्ञान महोत्सवात रमले युवा विज्ञानप्रेमी!

**अक्षराज : स्वामी दळवी**

**दि.०७, खडकवासला (पुणे) :** विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या माध्यमातून मानवी कल्याण, पर्यावरण संरक्षण आणि शाश्वत विकास साधण्याच्या उद्देशाने विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या विविध नाविन्यपूर्ण व समाजोपयोगी संकल्पनांचा आविष्कार ७ व्या जाधवर विज्ञान महोत्सवात पाहायला मिळाला. या महोत्सवात विद्यार्थ्यांनी आपल्या प्रयोगशीलतेतून विज्ञानाचे प्रत्यक्ष उपयोग सांगितले. कृत्रिम बुद्धिमत्ता, पर्यावरणीय शाश्वतता, कचऱ्यापासून संपत्ती निर्मिती, आपत्ती व्यवस्थापन, सायबर सुरक्षा, स्मार्ट रुग्णालय संकल्पना यांसारख्या आधुनिक विषयांवरील प्रकल्पांचे सादरीकरण करण्यात आले.



प्राचार्य डॉ. सुधाकरराव जाधवर कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय व डॉ. सुधाकरराव जाधवर इन्स्टिटयूट ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी आणि इन्स्टिटयूट ऑफ नर्सिंग, विज्ञान विभाग यांच्या वतीने तसेच विद्यार्थी विकास मंडळ, विज्ञान विभाग सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्या सहकार्याने 'सातव्या जाधवर सायन्स फेस्टिव्हल' या राज्यस्तरीय विज्ञान महोत्सवाचे आयोजन न–हे येथील डॉ. सुधाकरराव जाधवर शैक्षणिक संकुल – १ येथे करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ शास्त्रज्ञ ए.जी. नगरकर, मनीषा हवालदार, योगेश्वरी महाजन, संस्थेचे उपाध्यक्ष ॲड. शार्दुल जाधवर आदी उपस्थित होते.सायन्स अँड टेक्नॉलॉजी फॉर सोसायटी ही यंदाच्या महोत्सवाची मुख्य संकल्पना होती. महोत्सवामधील स्पर्धा शालेय (इयत्ता ८ वी ते १० वी), कनिष्ठ (इयत्ता ११ वी व १२ वी), वरिष्ठ महाविद्यालय (पदविका शिक्षण) आणि पदव्युत्तर व खुल्या अशा चार गटात स्पर्धा झाली. विजेत्यांना एकूण १ लाख रुपयांपेक्षा अधिकची पारितोषिके व ट्रॉफी देण्यात येणार आहेत.

ए.जी. नगरकर म्हणाले, आपण कमी आहोत असे विद्यार्थ्यांनी समजू नये. आपण सर्वोत्तम आहोत असा विचार करायला पाहिजे. देशासाठी आपण काय करु शकतो, याचा विचार करणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी योग्य मार्गाने जाऊन काम करा आणि जे काम करतोय त्यामध्ये समर्पित काम करणे आवश्यक आहे. नवनवे प्रयोग करताना अभ्यासाकडे दुर्लक्ष करु नका, असेही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितले.

ॲड. शार्दुल जाधवर म्हणाले, 'जाधवर सायन्स फेस्टिवल' च्या निमित्ताने विद्यार्थ्यांच्या कल्पनाशक्तीला व्यासपीठ मिळावे विज्ञान विषयाची विद्यार्थ्यांना आवड निर्माण व्हावी यासाठी संशोधन करणा–या विद्यार्थ्यांना १० लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येते. भारताबाहेरील इतर देशांमध्ये संशोधन करुन पेटंट मिळविण्याचे प्रमाण अधिक आहे.

भारतामध्ये संशोधन व पेटंटचे प्रमाण कमी असून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याकरिता जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटने अभिनव योजना सुरु केली आहे. इन्स्टिटयूटमधील संशोधन करणा–या विद्यार्थ्याला विनातारण १० लाख रुपयांची शिष्यवृत्ती देण्यात येणार आहे. याद्वारे विद्यार्थ्यांमध्ये विज्ञान व तंत्रज्ञान विषयाची गोडी निर्माण होत अधिकाधिक संशोधनास युवावर्ग प्रवृत्त होईल.

# वाफळे येथे बालआनंद बाजार उत्साहात संपन्न

**अक्षराज : साहेबराव परबत**

**दि.०८, सोलापूर :** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा चव्हाण पाटील वस्ती, वाफळे येथे बुधवार, दिनांक ७ जानेवारी २०२६ रोजी बालआनंद बाजार मोठ्या उत्साहात पार पडला. विद्यार्थ्यांना शालेय अभ्यासासोबतच व्यवहारज्ञान, कौशल्य व आर्थिक साक्षरतेचे धडे मिळावेत या उद्देशाने या बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. या बालआनंद बाजाराचे उद्घाटन सौ. साखरबाई वसेकर यांच्या हस्ते रिबीन कापून करण्यात आले. यावेळी उपस्थित सर्व महिला सदस्यांच्या हस्ते क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून बाजाराची सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमास शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष श्रीकांत शिवाजी पाटील, उपाध्यक्ष. नुतन गणेश वसेकर तसेच समितीचे सर्व सदस्य उपस्थित होते. खऱ्या अर्थाने आठवडी गाव बाजाराचे चित्र उभे राहील अशा पद्धतीने या बालआनंद बाजाराचे आयोजन करण्यात आले होते. विद्यार्थ्यांनी विविध प्रकारची फळे, ताज्या भाज्या तसेच चटकदार, खमंग व घरगुती खाद्यपदार्थ विक्रीसाठी ठेवले होते. यावेळी माता–पिता, आजी–आजोबा, ज्येष्ठ नागरिक, शिक्षक तसेच लहान–मोठ्या नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला व ताज्या भाजीपाल्याच्या खरेदीसाठी बाजारात गर्दी केली होती. बाजारात उपलब्ध असलेल्या भाज्यांचे आहारातील महत्त्व व स्थान याविषयी विद्यार्थ्यांनी तयार केलेले माहितीफलक (बोर्ड) लावण्यात आले होते, ज्यामुळे उपस्थितांना आरोग्यदायी आहाराबाबतही मार्गदर्शन मिळाले. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना विक्री, व्यवहार, संवादकौशल्य व आत्मविश्वास वाढवण्याची संधी मिळाली.

विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागाने व ग्रामस्थांच्या उत्तम प्रतिसादामुळे बालआनंद बाजार यशस्वीरीत्या संपन्न झाला.

